## जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांजकडून

क्रमांक महसूल / कार्या/ ३-४/ जमीन-१/ २९ / २००१-२००२.--ज्याअर्थी, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम २३) याचे कलम ४७-अ आणि महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापरात बदल व अकृषीक आकारणी) नियम १९६९ चा नियम ४(डड) व महाराष्ट्राचे राज्यपाल यांचा सन १९९९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४, दिनांक १ मार्च १९९९ पारित झालेला आहे ; आणि

ज्याअर्थी, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसूचना क्रमांक जीइएन/१०/२००१/प्र. क्र. ७०/२००१/नवि-१६, दिनांक १० सप्टेंबर २००१ अन्वये रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण व रत्नागिरी नगरपरिषदा ह्या महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ४ आणि ३४६ अनुसार "ब" वर्ग नगरपरिषदा म्हणून अधिसूचित करण्यात आल्या आहेत ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ११३ नुसार व राज्य शासनाने वेळोवेळी निहित केलेल्या आदेशानुसार जिल्हाधिकारी यांना जिल्ह्यातील अकृषीक आकारणी व रूपांतरीत कर निश्चित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यानुसार जिल्ह्यातील "ब" वर्ग नगरपरिषदांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४७-अ अन्वये रूपांतरीत कर लागू करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमांच्याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्या बाबतीत महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निहित केलेल्या अधिकारांचा वापर करून मी, जिल्हाधिकारी रत्नगिरी, रत्नागिरी जिल्ह्यातील रत्नागिरी व चिपळूण नगरपालिका क्षेत्र व नगरपालिका क्षेत्राच्या परिघापासून एक कि. मी. क्षेत्राकरिता जमीनीच्या वापरातील बदला दाखल जमीनधारकाने रूपांतरण कर देण्यासंबंधातील दायित्व म्हणून अकृषीक जमीन महसूल आकारणीच्या पाचपट इतका रूपांतरण कर लागू करण्यात येत आहे. नगरपरिषद रत्नागिरी करिता प्रस्तुत रूपांतरण कर दिनांक १ मार्च १९९९ पासून तसेच नगरपरिषद चिपळूण करिता दिनांक १० सप्टेंबर २००१ पासून पूर्वलक्षी प्रभावाने अंमलात येईल.

**जी. टी. बंदरी,**
जिल्हाधिकारी, रत्नागिरी.

रत्नागिरी, दिनांक १४ मार्च २००२.

---

## पोलीस सह आयुक्त, ठाणे यांजकडून

### मनाई आदेश

क्रमांक विशा/मनाई/आदेश/१०५०/०२.--ज्याअर्थी, माझी अशी खात्री झाली आहे की, ठाणे पोलीस आयुक्तालयात होळी धुलीवंदन व रंगपंचमी या सणाच्या कालावधीत सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी खालील अनुक्रमे नंबर १ ते ५ मध्ये नमूद केलेल्या कृत्यांना मनाई करणे आवश्यक आहे म्हणून, मी, अंबालाल वर्मा, पोलीस सह आयुक्त, ठाणे, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चा अधिनियम क्रमांक-२२ चे कलम ३३, पोट-कलम (म), (न), (ग) अन्वये, मला प्रदान केलेल्या अधिकारांन्वये आदेश देवून पोलीस आयुक्त परिसरात मनाई करीत आहे.

१. होळीसाठी वापरली जाणरी लाकडे ही चोरी करणे, कोणाची बिल्डींग पाडून किंवा गृहपयोगी, कार्यालयीन फर्निचर चोरून जाळणे, खाजगी किंवा सरकारी वैद्य अवैध झाडे तोडणे विशेषतः कोणत्याही वखारीतून लाकडे चोरणे किंवा त्यांना आग लावणे.

२. कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी, ज्यामुळे डोळ्यांना इजा होईल असे रंगमिश्रीत पाणी किंवा रंग अगर द्रव्यपदार्थ एखाद्याचे अंगावर टाकणे.

३. सार्वजनिक ठिकाणी, इमारतीवरून, पदपथावरून चालणाऱ्या लोकांवर, वाहनांवर अगर वाहनातील व्यक्तीवर रंगीत पाण्याचे फुगे, आक्षेपार्ह पदार्थ, पाण्याचे फुगे फेकण गुलाल किंवा राख उधळणे.

४. एखाद्याचे पाहुन वेडेवाकडे हावभाव करणे किंवा एखाद्याला उद्देशुन अश्लील शिवीगाळ अगर बिभत्स नाच करणे.

५. कोणावरही बळजबरीने धोकादायक रसायन किंवा रंग-मिश्रीत पाणी फेकणे, त्यामुळे दोन समाजात तेढ निर्माण होईल असे कृत्य करणे.

हा आदेश दिनांक २८ मार्च २००२ ते दिनांक २ एप्रिल २००२ रोजी २४-०० वाजेपर्यंत अंमलात राहील.

मी, सूचना देतो की, सदर आदेशाच्या प्रती, ठाणे पोलीस आयुक्तालयात, सहज दिसणाऱ्या सार्वजनिक ठिकाणी लावून व ध्वनीक्षेपकाद्वारे जाहीर करून त्याचा प्रसार करावा. व त्याबाबत, योग्य त्या नोंदी ठेवाव्यात.

**अंबालाल वर्मा,**

ठाणे, दिनांक २१ मार्च २००२. पोलीस सह आयुक्त, ठाणे.

---

## जिल्हादंडाधिकारी ठाणे यांजकडून

### आदेश

क्रमांक गृह/का-१/टे.-३/निवडणूक/ वशी-२८६/ ०२.--ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य माध्यामिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ मुंबई यांचा परीक्षा कार्यक्रम २००२ जाहीर केलेला आहे, व ठाणे जिल्हयात उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा इयत्ता १२ वी दिनांक २२ फेब्रुवारी २००२ चे दिनांक १५ मार्च २००२ व माध्यमिक शालांत परीक्षा इयत्ता १० वी दिनांक १ मार्च २००२ ते दिनांक १६ मार्च २००२ या कालावधीत घेण्यात येणार आहेत.

ज्याअर्थी, परीक्षा केंद्रावर शांतता व सुरक्षितता राखण्याच्या दृष्टीने परीक्षा केंद्राच्या १०० मीटरच्या परिसरात अनावश्यक लोकांची गर्दी होवू न देणे व परीक्षा केंद्राची प्रक्रिया सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने योग्य तो प्रतिबंधात्मक आदेश लागू करणे क्रमप्राप्त वाटते.

त्याअर्थी, उपरोक्त परिस्थितीत मी, आय. एस. चहल, ठाणे जिल्हयाच्या जिल्हादंडाधिकारी, फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४(१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून, ठाणे ग्रामीण पोलीस हद्दीतील इयत्ता १२ वी च्या एकूण १७ शाळांच्या व इयत्ता १० वी एकूण ३९ शाळांमध्ये अशा एकूण ५६ शाळांच्या परीक्षा केंद्रासाठी वरील परीक्षा नियोजित तारखांकरिता प्रस्तावित करण्यात येत असलेल्या परीक्षा केंद्राच्या इमारतीच्या सभोवतालच्या १०० मीटर अंतराचे आत खालील व्यक्तीशिवाय अन्य व्यक्तीस प्रवेश करण्यास मनाई करीत आहे ;--

(१) पर्यवेक्षक व परीक्षा प्रक्रिया संबंधित अधिकारी/कर्मचारी.

(२) परीक्षार्थी.

(३) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ प्राधिकृत केलेल्या इतर व्यक्ती.

उपरोक्त मनाई आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीवर भारतीय दंड संहितेचे कलम १८८ नुसार कायदेशीर कारवाई केली जाईल.

**आय. एस. चहल,**

ठाणे, दिनांक २० फेब्रुवारी २००२. जिल्हा दंडाधिकारी, ठाणे.